**प्रकल्प प्रवर्तक मे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड (एमएसआरडीसी), (महाराष्ट्र शासन उपक्रम, मुंबई) यांच्या प्रस्तावित पुणे रिंग रोड, पश्चिम संरेखन-६८.८ किमी उर्से गाव ते वरवे (केळवडे), जिल्हा-पुणे, महाराष्ट्र या प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड (एमएसआरडीसी), (महाराष्ट्र शासन उपक्रम, मुंबई) यांच्या प्रस्तावित पुणे रिंग रोड, पश्चिम संरेखन-६८.८ किमी उर्से गाव ते वरवे (केळवडे), जिल्हा-पुणे, महाराष्ट्र या प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता दत्तकृपा गार्डन मंगल कार्यालय, हनुमान चौक, मुलखेड रस्ता, घोटावडे, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-८६/२०२१, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी -२१०९३०-एफटीएस-०१२७, दिनांक ३०-०९-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठीत करण्यात आलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पुणे<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | अध्यक्ष |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - | सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - | आयोजक |

बैठकीच्या सुरुवातीस श्री. नितीन शिंदे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-२ तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिक उपस्थित जे सभागृहाबाहेर होते, त्यांना आवाहन केले की जनसुनावणीची वेळ झालेली असून माननीय अध्यक्ष हे स्थानापन्न झालेले आहेत. तरी सर्वांना विनंती आहे की त्यांनी सभागृहात येऊन स्थानापन्न व्हावे.

श्री. नितीन शिंदे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-२ तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत नागरिकांना सभागृहात येण्याची विनंती केली.

त्यांनी स्वतःचा व श्री. हिम्मत खराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांचा परिचय करुन दिला. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

सर्वजण स्थानापन्न झाल्यानंतर त्यांनी कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना उपस्थितांना केली. त्यानुसार, सभागृहात प्रवेश करताना सॅनिटायझर व मास्क ठेवण्यात आले होते व त्यांनी बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

श्री. नितिन शिंदे, उप- प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे-२ तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. हिम्मत खराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. शिंदे, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड (एमएसआरडीसी), (महाराष्ट्र शासन

उपक्रम, मुंबई) यांच्या प्रस्तावित पुणे रिंग रोड, पश्चिम संरेखन-६८.८ किमी उर्से गाव ते वरवे (केळवडे), जिल्हा-पुणे, महाराष्ट्र या प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला आहे.

सदरहू प्रकल्प हा पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये संवर्ग "ब" मध्ये मोडत आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासकीय भवन, १५ वा मजला, मंत्रालय, मुंबई – ४० ०३२ यांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १०-०२-२०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, म.प्र.नि.मंडळ, पुणे यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्तामध्ये मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर; मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय - पुणे, मा. अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालय – पुणे; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद – पुणे; महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - पुणे; तहसीलदार, तहसील कार्यालय- मावळ, मुळशी, हवेली, भोर, जिल्हा – पुणे; पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय – मुंबई; मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – मुंबई; प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – पुणे; उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण.मंडळ -

पुणे, मप्रनि मंडळाचे संकतेस्थळ व खालील ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) **मावळ तालुका** – उर्से, पाचाणे, चांदखेड, बेबडओहोळ, धामणे, परंदवडी;

२) **मुळशी तालुका** – मुठे, कातवडी, मारणेवाडी, आंबेगाव, उरवडे, कासार आंबोळी, भरे, अंबडवेट, मातेरेवाडी, घोटावडे, रिहे, पडळघरवाडी, जवळ, केमसेवाडी व पिंपळोळी;

३) **हवेली तालुका** – रहाटवडे, कल्याण, घेरा सिंहगड, मोरदरवाडी, खामगाव मावळ, वरदाडे, मालखेड, मांडवी बु., सांगरुण, बहुली व भगतवाडी;

४) **भोर तालुका** – कांजळे, खोपी, कुसगाव, रांजे व केळवडे.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले. श्री. शिंदे यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणास सुरवात केली. पर्यावरण सल्लागार हे प्रकल्पाची विविध माहित देत असताना सांगितले की सदरहू रिंग रोड हा मावळ, मुळशी, हवेली आणि भोर या चार तालुक्यातून जात आहे. हा सहा पदरी रस्ता असेल, तीन मार्गिका येण्यासाठी व तीन जाण्यासाठी अशा सहा आणि भविष्यातील तरतुद म्हणून एक-एक मार्गिका करण्यासाठी जागा/सुविधा येथे ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे हा प्रकल्प ४ व ४ आठ पदरी असेल. येथे ११० मीटर्सचा पट्टा आणि वाहनांचा वेग हा १२० कि.मी. प्रति तास गृहित धरलेला आहे. यात तीन प्रमुख पूल, १६ छोटे पूल आणि दोन व्हाया डग आणि एकूण आठ बोगदे या प्रकल्पात प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

यावेळी उपस्थितांनी या मुद्द्यांवर विस्तारित माहिती सांगण्याची विनंती करण्यात आली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पुर्ण सादरीकरण झाल्यानंतरच आपण चर्चा करु. याठिकाणी भूसंपादनाचे क्षेत्र हे ७६४ हेक्टर आहे. तर वनक्षेत्र ह ४७ हेक्टर आहे. वनेत्तर क्षेत्र ७१८ हेक्टर आहे. एकूण ४ तालुके, ३७ गावे आहेत.

**<u>खालील व्यक्तींनी प्रश्न उपस्थित केले व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक / पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>**

१) **<u>श्री. दिनकर दळवी, गाव-कांजळे, तालुका-भोर, जिल्हा-पुणे,</u>**

श्री. दळवी यांनी असे नमूद केले की, सदरची जनसुनावणी ही पश्चिम रिंग रोडसाठी असल्याने आम्ही ऐकून घेतले. तर बाधित सर्व ३७ गावांना आपण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल पाठविलेला आहे असे आपण सांगितले. तर तो मराठीत पाठविलेला आहे काय? तसेच ४२५ पानांचा अहवाल मराठीत सर्व ३७ गावांना उपलब्ध करण्यात आलेला आहे का, याबाबत उत्तर देण्याची सूचना त्यांनी केली. जर शासनाने लोकांसाठी सदरहू अहवाल स्थानिक भाषेत मराठीत देणे बंधनकारक असताना तो का देण्यात आलेला नाही?

- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा इंग्रजीत प्राप्त झाला, तो सर्व ग्रामपंचायतींनी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच मराठी व इंग्रजी भाषेमधील कार्यकारी सारांश अहवाल ग्रामपंचायतींना पाठविण्यात आलेला आहे.

त्यांनी पुढे प्रश्न विचारला की ही पश्चिम रिंग रोडची सुनावणी असून प्रत्येक गावांतील लोकांनी येथे येऊन त्यांचे विचार, सूचना वा आक्षेप नोंदविणे हे कायद्याने आवश्यक असणे आवश्यक आहे वा नाही? जर आहे, तर मावळ तालुक्यात चांदखेड गाव आहे. तेथे प्रशासनाने मोजणी आयोजित केलेली आहे. जर चांदखेड नाही, तर त्याच्याशेजारी गावातील व्यक्तीने येणे अपेक्षित होते. आज मावळमधील एकही व्यक्ती आलेली नाही. कारण ते मोजणीच्या कामात अडकले आहेत. मावळ तालुक्यातील पाच गावे पाचाणे, बेबडओहळ, चांदखेड परंदवाडी आणि धामणे ही गावे बाधित आहेत. ते ग्रामस्थ येऊ शकले नाहीत. त्यास शासनच जबाबदार आहे. कारण एकावेळी दोन शासकीय कृती चालू आहेत त्यामुळे आजच्या ह्या जनसुनावणीमुळे त्यांचा न्याय हक्क डावलण्यात येत आहे. तरी आजची ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. त्यांनी उपस्थितांना आपला पाठींबा आहे का याची विचारणा केली असता सर्वांना होकार दिला. त्याचवेळी उपस्थितांनी सुनावणी रद्द करा अशी घोषणा देण्यास सुरवात केली.

- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे उपस्थितांना सांगितले की आपल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. याबाबत निर्णय हा जिल्हादंडाधिकारी घेतील. त्यांनी पुढील सादरीकरण करण्याची सूचना केली.

त्याचवेळी उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की अहवाल हा इंग्रजीत आहे, तर त्यास आम्ही कसे उत्तर देऊ?
- आयोजक यांनी ह्याही प्रश्नाची नोंद घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.
यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की समिती आपले प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे विचार, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून समितीस प्रकल्प मंजूर करणे, नाकारणे याचा अधिकार नाही. आपले विचार, आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृत्तात नोंद घेण्यात येऊन शासनास अहवाल पाठविण्यात येतो.

उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण सुनावणी ठेवली व ४०० पानांचा अहवाल इंग्रजीत दिला आहे. भाषावार प्रांतरचना झाली, कुठल्या शेतक-याला इंग्रजीत अहवाल कळणार? तसेच पर्यावरण अहवाल हा त्या बाधित शेतक-याला पोहचलेलाच नाही.
- आयोजकांनी सांगितले की मराठी व इंग्रजी भाषेमधील कार्यकारी सारांश अहवाल ग्रामपंचायतींना पाठविण्यात आलेला आहे तसेच आपल्या मुद्दयांची नोंद घेण्यात आलेली आहे.

काही उपस्थितांनी प्रश्न विचारला की कोणत्या ग्रामपंचायतीला पाठविले आहेत?
- आयोजकांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबतच कार्यकारी सारांश अहवाल हा मराठी व इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तो सर्व ग्रामपंचायतींना सादर करण्यात आलेला आहे.

२) **श्री संतोष घारे, गाव-जवळ, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-**

श्री. संतोष घारे यांनी आक्षेप नोंदविला की, जनसुनावणीची प्रक्रिया फक्त पार पाडायची आहे, आपल्याकडून जनसुनावणीसाठी पूर्वतयारी करण्यात आलेली नाही. ही जनसुनावणी घेणेच चुकीचे आहे.
- आयोजक यांनी सांगितले की सदर मुद्द्याची नोंद घेण्यात आलेली आहे तसेच जनसुनावणीसाठी निर्देशित केलेली प्रक्रिया म.प्र.नि. मंडळाने पार पाडलेली आहे. त्यावर

आपला काही आक्षेप असल्यास तो आपण नोंदवू शकता. तो शासनास पाठविण्यात येईल. जनसुनावणीची प्रक्रिया चुक की बरोबर याबाबत शासन निर्णय घेईल.

उपस्थितांनी अहवाल ग्रामपंचायतीस कुठे पाठविले याबाबत आक्षेप नोंदविला.
- आयोजक यांनी ग्रामपंचायतीस पाठविलेले पत्र वाचून दाखविले आणि प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात समक्ष दिलेली पोच दाखविली. सर्व ग्रामपंचायतींना नागरिकांना पर्यावरणीय अहवाल अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्याची सूचना करण्यात आलेली आहे. आयोजक यांनी रितसर मागणी केल्यास त्याची फोटोकॉपी उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले.

श्री संतोष घारे यांनी आक्षेप नोंदविला की इंडियन एक्सप्रेस व लोकसत्ता हे पश्चिम महाराष्ट्रातील वृत्तपत्रे येथील एकाही गावात येत नाहीत. तसेच पुढील मुद्दा उपस्थित केला की इंटरनेट नसल्यामुळे ग्रामसेवक, तलाठी, भाऊसाहेब त्या त्या कार्यक्षेत्रात येत नाहीत, त्यामुळे हे अहवाल ग्रामपंचायतीस आले आणि त्यांनी लोकांना उपलब्ध केले असे कोणत्याही ग्रामपंचायतीत घडले नाही. तसेच अहवाल लिंक वरती टाकला असला तरी ब-याच गावात रेंज नसल्यामुळे ऑनलाईन टाकलेला अहवाल कळत नाही.
- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल हा ऑनलाईन बरोबरच प्रत्यक्षरित्या उपलब्ध करण्यात आलेला आहे.

श्री घारे यांनी जर एमएसआरडीसीचा प्रकल्प आहे तर अहवाल एमएसआरडीसीच्या साईटवर उपलब्ध नाही याबाबत आक्षेप नोंदविला. त्यांनी पुढे सांगितले की ग्रामपंचायतीने जाहिर सूचना लावणे, चावडी वाचन करणे ही प्रक्रिया ग्रामपंचायतीमार्फत किंवा म.प्र.नि. मंडळामार्फत किंवा एमएसआरडीसी मार्फत होणे गरजेचे होते व ते झालेले नाही.
- आयोजक यांनी सांगितले की सदरहू अहवाल हा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून आपल्या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की फक्त ३६ ग्रामपंचायत कार्यालयातच नाही, तर इतरही विविध अधिसूचित शासकीय कार्यालयात अहवाल उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यांनी संपूर्ण नांवे वाचून दाखविली. त्यामुळे काही कारणांमुळे जर ग्रामपंचायत कार्यालयात प्रत मिळाली नाही, तर तहसील कार्यालय,

म.प्र.नि. मंडळ कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क केला असता, तर आपणास प्रत उपलब्ध झाली असती.

३) **श्री. बबनराव शिंदे, गाव-रिहे, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-**

श्री. बबनराव शिंदे यांनी आक्षेप नोंदविला की, बैठकीबाबत दवंडी देण्यात आलेली नाही. त्याबाबत म.प्र.नि.मंडळाने सर्व ग्रामपंचायत कार्यालयात तशा सूचना दिलेल्या होत्या का? त्यावेळी काही उपस्थितांनी दवंडी झाल्यानंतर जनसुनावणी आयोजित करण्याची मागणी केली.

- आयोजक यांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल हा प्रत्येक ग्रामपंचायतींना अवगत करण्यात आलेला आहे.

४) **श्री संतोष घारे, गाव-जवळ, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-**

श्री. घारे यांनी आक्षेप नोंदविला की, असे स्पष्ट होते की आपल्या पर्यावरणीय अहवालात काय आहे व कोणते मुद्दे उपस्थित करायचे याबाबत एकही मुद्दा शेतक-यांपर्यंत पोहचलेला नाही. तरीही आपले म्हणणे आहे की ही जनसुनावणी पूर्ण करायची व अहवाल इंग्रजीत आहे. त्यामुळे तो स्थानिकांना समजणे कठिण आहे. त्यापेक्षाही तो अहवाल जनतेपर्यंत पोहचलाच नाही. त्यामुळे स्थानिकांनी मुद्दे काय मांडावे हेच कळले नाही.

- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की उपस्थित तेच तेच मुद्दे सांगत आहेत. आपल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. आपणास अहवालाची प्रत आता उपलब्ध करण्यात येईल. आपण सादरीकरण पुर्ण होऊ द्या, आपणास अध्यक्षांच्या परवानगीने सात दिवसांची मुदत सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी देता येऊ शकते. आपण आपल्या लेखी सूचना, आक्षेप म.प्र.नि. मंडळ कार्यालयास पाठवू शकता. ते सर्व शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

५) **श्री राजेन्द्र चोरगे, गाव-घोटवडे, तालुका- मुळशी. जिल्हा-पुणे:-**

श्री. चोरगे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, मी स्वत: बाधित शेतकरी असून माझ्यासारखे २००-२५० बाधित शेतकरी आहेत. त्यांना कळलेच नाही की येथे जनसुनावणी आहे. ग्रामपंचायतीमार्फत हा प्रश्न सर्व सामान्य शेतक-यांपर्यत पोचणे आवश्यक होते. तरी ग्रामपंचायतीस त्याचप्रमाणे शासनाकडून आदेश निर्गमित करण्यात

यावेत. तसेच सदरहू पर्यावरणीय अहवाल हा मराठीत सर्वसामान्यांसाठी उपलब्ध व्हावा, आणि आम्हांला वेळ देण्यात यावा व परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.
- अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की जनसुनावणीत प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानिकांच्या सूचना, आक्षेप नोंदविण्यात येतात. येथे जरी पर्यावरण अहवाल ग्रामपंचायतीस उपलब्ध करण्यात आलेला होता, तरीही तो काही कारणांमुळे सर्वांना पोहचलेला दिसत नाही. तरी आपणास आवाहन करण्यात येते की आपण प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरणीय सादरीकरण पूर्ण होऊ द्यावे व पुढील सात दिवसात आपण आपल्या सूचना, आक्षेप म.प्र.नि. मंडळ कार्यालयास सादर करण्यात याव्यात.

उपस्थितांनी सूचना केली की सात दिवसात ग्रामपंचायतीकडून आम्हांला अहवाल, माहिती मिळणार नाही. नंतर अहवालाचा अभ्यासास आम्हांला वेळ लागेल. नंतर स्थानिक सूचना, आक्षेप नोंदवू शकतील. तरी एक महिन्याची मुदत देण्यात यावी.
- अध्यक्ष यांनी सांगितले की ग्रामस्थांनी पर्यावरण अहवालाचा अभ्यास करावा तसेच स्वतःच्या गावाचा अभ्यास करावा व सूचना वा आक्षेप नोंदवावेत. एक विशेष बाब म्हणून सात दिवसांची मुदत देण्यात येत आहे.

यावेळी उपस्थितांनी सात दिवस हा वेळ अपुरा असून एक महिना कालावधी वाढविण्याची गरज असल्याचे सांगितले.
- अध्यक्ष यांनी येथे पंधरा दिवसांची मुदत देत असल्याचे सांगितले.

यावेळी सर्व उपस्थितांनी सांगितले की कागदपत्रे गोळा करण्यात वेळ जाईल. बरेच शेतकरी मोजणीमध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे एक महिन्याची मुदतीची आवश्यकता आहे.
- आयोजकांनी सांगितले की, अध्यक्षांच्या परवानगीने आपणास १५ दिवस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

६) **श्री बाळासाहेब बराटे, गाव- बहुली, तालुका- हवेली, जिल्हा-पुणे:-**
श्री बराटे यांनी माहिती दिली की त्यांना भ्रमणध्वनीव्दारे सदर जनसुनावणीची माहिती मिळाली. सर्व शेतक-यांच्या दृष्टीने दसरा हा सण महत्वाचा असतो. आज खंडेनवमी आहे. त्यास नांगरपूजन महत्वाचे आहे. त्यामुळे आजचा सुनावणीचा दिवसही चुकीचा आहे. तरी

आजची सुनावणी रद्द करुन १० दिवसांनी किंवा एक महिन्याने परत घेण्यात यावी असे माझे मत आहे.
- आयोजकांनी सांगितले की, अध्यक्षांच्या परवानगीने आपणास १५ दिवस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

७) **<u>श्री संतोष घारे, गाव-जवळ, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-</u>**

श्री. घारे यांनी सांगितले की, आम्ही स्थानिक शेतकरी सहकार्य करण्यास तयार आहोत. मात्र प्रशासनाकडून प्रक्रिया राबविताना ज्या त्रुटी राहून गेल्या, त्या प्रशासनास स्वीकाराव्या लागतील. कारण ग्रामपंचायतीस पत्र पाठविताना त्यात दवंडी, चावडी वाचन, जाहिर सूचना याबाबत योग्य तो आदेश देणे अपेक्षित होते. त्याचप्रमाणे संपूर्ण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा शेतक-यांच्या माहितीसाठी मराठीत ग्रामपंचायतीस सादर करणे अपेक्षित होते. कार्यकारी सारांश अहवालात माहिती अत्यंत तोकडी आहे, त्यातून फारशी माहिती मिळत नाही. प्रस्तावित प्रकल्पामुळे होणा-या सामाजिक आघाताबाबत स्थानिक शेतक-यांच्या भावना तीव्र आहेत. येथे उपस्थित प्रतिनिधी आहेत. त्यामुळे वादाला वाद होण्यापेक्षा एक महिन्याची मुदत द्यावी, त्याची दवंडी करण्याच्या सूचना देण्यात याव्यात, एक महिन्याने परत जाहिर जनसुनावणी घ्यावी, त्यास आम्ही स्थानिक शेतकरी उपस्थित राहू. आमच्या लोकशाही हक्कावर गदा आणू नका, नाहीतर आम्हांस या बैठकीवर बहिष्कार टाकावा लागेल. कृपया प्रशासनाने आपली भूमिका जाहिर करावी.
- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आताच अध्यक्षांची चर्चा करण्यात आलेली आहे. आपणास सर्वांना विनंती आहे की १५ दिवसात आपण आपल्या सूचना, आक्षेप नोंदवाव्यात.

यावेळी सर्व उपस्थितांनी एक महिन्याची मुदत वाढविण्याची पुन:श्च मागणी केली.
- आयोजक आणि अध्यक्ष यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, स्थानिक शेतकरी, उपस्थितांनी केलेल्या मागणीनुसार एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आपल्या सूचना, टीका-टिप्पणी, आक्षेप आपल्या सोयीनुसार म.प्र.नि.मंडळ कार्यालय / तहसील कार्यालय / जिल्हाधिकारी कार्यालय-पुणे येथे सादर करण्यात यावेत. हा अहवाल आपणापर्यंत उपलब्ध होण्याच्या सूचना सर्व ग्रामपंचायतींना देण्यात येतील. सर्व ग्रामपंचायतींना

जाहिरपणे कळविण्याचे निर्देश देण्यात येतील, आपण सादर केलेल्या लेखी सूचना/आक्षेप बैठकीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येईल.

८) **श्री राजेंद्र चोरगे, गाव-घोटवडे, तालुका-मुळशी. जिल्हा-पुणेः-**

श्री. राजेंद्र चोरगे यांनी असे सांगितले की, सर्वांच्या वतीने आपणास विनंती करतो की , हा जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे, तो प्रत्येक ग्रामपंचायतीस स्थानिक भाषेत मराठीमध्ये उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याचप्रमाणे सर्वांच्या वतीने विनंती आहे की ही जनसुनावणी रद्द करुन एक महिन्याने परत जनसुनावणी घेण्यात यावी. कारण आम्ही शेतकरी आहोत. आम्हांला पर्यावरणाचे सर्वप्रकारचे ज्ञान नाही. ही बैठक प्रत्येक गावात, तालुक्यात आयोजित करण्यात यावी. म्हणजे लोकांना उपस्थित राहणे सोयीचे होईल.

- आयोजक यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवाल हा मराठीत उपलब्ध करण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक गावात व प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बैठक घेणे हे शासनाच्या नियमामध्ये बसत नाही. अशा सुनावणीच्यावेळी सर्वांच्या सोयीचे स्थान पाहूनच तेथे जनसुनावणी बैठक आयोजित करण्यात येते. त्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिल्याप्रमाणे येथे जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

९) **श्री. दिनकर दळवी, गाव-कांजळे, तालुका-भोर, जिल्हा-पुणेः-**

श्री. दिनकर दळवी म्हणाले की सर्वांच्या वतीने मी विनंती करतो की या प्रकल्पात ७५४ हेक्टर जमिन बाधित होणार असून ६८ कि.मी. एवढे अंतर येथील प्रकल्पात आहे. २० हजार लोक बाधित होणार आहेत, तेही ७/१२ वर नावे असलेली आहेत. कोविडच्या पार्श्वभूमीवरही बाधित कुटुंबातील एक व्यक्ती जरी येथे आली असती, तरी येथे बसू शकली नसती. येथे ४० गावांची एकत्रित सुनावणी घ्यायची, म्हणजे प्रशासनास लोकांसाठी देखावा करायचा आहे असे वाटते. जर आपणास जनसुनावणी घ्यायची असेल, तर अहवाल हा मराठीत उपलब्ध करण्यात यावा, आजची सुनावणी ही रद्द करण्यात येऊन एक महिन्याने जनसुनावणी प्रत्येक तालुक्यात आयोजित करण्यात यावी म्हणजे प्रत्येक शेतकरी आपापले म्हणणे अभ्यास करुन मांडेल. श्री दळवी यांनी वरिल मागण्या मान्य आहेत काय याबाबत सर्वांना विचारणा केली असता सर्वांनी पाठिंबा व्यक्त

केला. तसेच उपस्थितांनी अहवालात सामाजिक परिणामांवर भाष्य करताना असे नोंदविलेले आहे की बाजारभावापेक्षा जास्त भाव देणार असल्याने जमिन उपलब्ध होईल. मात्र वास्तव तसे नाही. तर अभ्यासासाठी शेतक-यांना पुन्हा वेळ द्यावा अशी आमची विनंती आहे. या मुद्द्यावर आपला संबंध नाही, हे कायद्यानुसार संयुक्तिक ठरत नाही. तरी मराठीत पर्यावरणीय अहवाल मिळावा आणि एक महिन्याची मुदतीनंतर जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी.

- अध्यक्ष यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी ही प्रस्तावित रिंग रोडमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत हरकती नोंदविण्यासाठी आहे, तरी आपण पर्यावरण विषयक सुचना, टिका-टिप्पणी, आक्षेप वा हरकती असल्यास त्या सादर कराव्यात.

१०) **<u>श्री राजेन्द्र चोरगे, गाव-घोटावडे, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-</u>**

श्री राजेन्द्र चोरगे यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की आपणास हात जोडून नम्र विनंती आहे की शेतक-याची विनंती प्रशासनाने मान्य करावी. सदरहू ही जनसुनावणी रद्द करुन एक महिन्याने परत घ्यावी, मराठीत अहवाल सर्व ग्रामपंचायत कार्यालयात पाठविण्यात यावा.

- आयोजक यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात बरेच तांत्रिक मुद्दे आहेत, म्हणून सर्वांना समजण्यासाठी कार्यकारी सारांश अहवाल मराठीत उपलब्ध करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायतीस सूचना करण्यात येईल की उपरोक्त अहवाल सर्वांना उपलब्ध होण्यासाठी जाहिर सूचना लावावी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिलेला आहे.

११) **<u>श्री संतोष घारे, गाव-जवळ, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-</u>**

श्री. घारे यांनी मत व्यक्त केले की, यावरुन असे दिसून येते की येथे फक्त जनसुनावणी प्रक्रिया पूर्ण करायची आहे. यांना शेतक-यांच्या आक्षेपांबाबत काहीही नाही, किंबहुना ही समिती आपल्या सूचनांना बांधिल नाही.

- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या हरकती, सूचना वा आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यांचा इतिवृत्तामध्ये समावेश करण्यात येऊन अध्यक्षांच्या मान्यतेने शासनास सादर

करण्यात येईल. त्याचप्रमाणे बैठकीची व्हिडिओग्राफी चालू असून ती सी.डी. जशीच्या तशी शासनास इतिवृत्त, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनात पाठविण्यात येईल. आपण रितसर मागणी केल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल.

यावेळी मुद्दा उपस्थित करण्यात आला की प्रांतअधिकारी यांच्याकडे आम्ही काही मुददे उपस्थित केलेले होते, ते या बैठकीत आलेले नाहीत.

- आयोजक यांनी सांगितले की ही पर्यावरणीय मुद्द्यांवर बैठक असून प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी ही बैठक आहे. आपण प्रांत अधिकारी यांच्याकडे उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे मप्रनि मंडळास प्राप्त झाल्यानंतर ते शासनास सादर करण्यात येतील. आयोजक यांनी परत सांगितले नियमानुसारच ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून माननीय अध्यक्षांनी एक महिन्याचा कालावधी आपणास लेखी सूचना, आक्षेपांसाठी दिलेला आहे.

## १२) <u>श्री. दिनकर दळवी, गाव-कांजळे, तालुका-भोर, जिल्हा-पुणे:-</u>

श्री. दिनकर दळवी यांनी सांगितले की स्थानिकांची एक कृती समिती स्थापन झालेली असून ती आता याबाबत निर्णय घेईल. यावेळी श्री राजेन्द्र चोरगे यांनी सांगितले की माझी प्रशासनास परत हात जोडून विनंती आहे की जो विषय मी या अगोदर मांडला आहे त्याप्रमाणे पर्यावरण मुल्यांकन अहवाल हा मराठीत सर्व ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याठिकाणी दवंडी देण्यात यावी, चावडी वाचन, जाहिर सूचना याबाबत निर्देश देण्यात यावेत. आम्हांला अभ्यास करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी. जनसुनावणी ही चार तालुक्यांची एकाच ठिकाणी घेण्याऐवजी चारही तालुक्यात वेगवेगळी सुनावणी घेण्यात यावी. आपणास हवे असल्यास जनसुनावणी एका दिवशी सकाळी व दुपारी घेण्यात याव्यात. ही जनसुनावणी त्वरित रद्द करण्यात यावी. ही विनंती प्रशासनाने मान्य करावी. अन्यथा शेतक-यांना वेगळी भूमिका घ्यावी लागेल.

- पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जिल्हा प्रशासन, प्रकल्प प्रवर्तक यांच्याशी चर्चा करुन याबाबत कायदेशीर बाबी तपासून पाहिल्या. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या

अधिसूचनेतील तरतुदींच्या बाबतची माहिती वाचण्यास सुरुवात केली. त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याचे अधिसूचनेतील स्वरुप वाचून दाखविले. त्यातील तरतुदींनुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा सारांश म्हणजे कार्यकारी सारांश अहवाल हा इंग्रजीत व स्थानिक भाषेत येथे मराठीमध्ये उपलब्ध करुन द्यायचा आहे. त्यांनी सर्व अधिसूचनेतील तरतुदी वाचून दाखविल्या. आयोजक यांनी त्यानंतर पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण पुढे चालू करण्याची सूचना केली. आयोजकांनी सांगितले की अध्यक्ष यांनी विशेष बाब म्हणून आपणास एक महिन्याची मुदत दिलेली आहे. आपण आपल्या सूचना, टीका-टिप्पणी, आक्षेप म.प्र.नि.मंडळ कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय येथेच सादर करण्यात यावेत.

१३) **<u>श्री राजेन्द्र चोरगे, गाव-घोटावडे, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणेः-</u>**

श्री. राजेंद्र चोरगे म्हणाले की, सर्वसामान्य शेतकऱ्यांना आजचा विषय माहित नाही. तरी कळकळीची विनंती की इंग्रजी अहवाल हा मराठीत उपलब्ध व्हावा. तो अभ्यास करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी.

- आयोजक यांनी परत अधिनियमातील तरतुद वाचून दाखविली व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा कार्यकारी सारांश अहवाल हा मराठीत सर्व ग्रामपंचायत कार्यालयात पाठविलेले असल्याचे सांगितले. अधिसूचनेतील सर्व निर्देशांचे म.प्र.नि.मंडळाने पालन केलेले आहे. ग्रामपंचायतीकडून सदरहू अहवाल उपलब्ध होण्यात काही अडचणी आल्याचे निदर्शनास आल्यानेच अध्यक्षांनी विशेष बाब म्हणून आपणास लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी एक महिन्याची मुदत दिलेली आहे. मात्र श्री चोरगे हे स्वतःच्या मागणीबाबत ठाम होते व तेचतेच मुद्दे मांडत होते.

१४) **<u>श्री शामसुंदर जायगुडे, गाव-केळवडे, तालुका- भोर, जिल्हा - पुणे</u>**

श्री. जायगुडे यांनी मत व्यक्त केले की, मी सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील आहे. माझ्या गावात नोंदलेली झाडे ३,७८७ आहेत. त्यात देशी व विदेशी प्रजातीची झाडे आहेत. ते म्हणाले की जगातील २७ देश ते बघून आलेले आहेत. ग्रामपंचायतीचे ९५ पुरस्कार मला मिळालेले आहेत. महाराष्ट्रातील शाळा, विद्यापीठ नसेल की तेथे मला ओळखत नाहीत. आपण जो अहवाल दिला, त्याच्या ५०%झाडे माझ्या एकट्याच्या शेतात आहेत. त्यांनी सांगितले की किती झाडे तोडणार आहेत याचे सरकारी आकडे मागितले आहेत.

- आयोजक यांनी येथे सांगितले की याचीच नोंदी घेण्यासाठी आपण बसलेलो आहोत. तुमचे सर्व लेखी आक्षेपांची नोंद घेऊनच शासनास आपले आक्षेप सादर करण्यात येतील. आपण हरकती, सूचना घेण्यासाठीच जमलेलो असून त्याचे इतिवृत्त शासनास पाठविणार आहोत.

१५) **<u>श्री राजेश शिंदे, गाव-रिहे, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-</u>**

श्री. राजेश शिंदे यांनी सांगितले की दवंडी, चावडी वाचन करण्यात आलेले नाही. ते होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक तालुक्यात वेगळी जनसुनावणी घेणे गरजेचे आहे.
- आयोजक यांनी सांगितले की, आपल्या मुद्दयाची दखल घेण्यात आलेली आहे.

१६) **<u>श्री राजेन्द्र चोरगे, गाव-घोटावडे, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-</u>**

श्री. चोरगे यांनी सांगितले की आम्ही आमच्या लाख मोलाच्या जमिनी देत आहोत. तरी आमच्या मागणीचा विचार करण्यात यावा. ही जनसुनावणी रद्द करुन एक महिन्याने परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. त्यांनी त्यांच्या परत पूर्वीच्या चारीही मागण्या परत वाचून दाखविल्या.
- आयोजक यांनी परत अधिसूचनेतील तरतुदी वाचून दाखविल्या. आयोजकांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करणे क्रमप्राप्त होते. मात्र येथील जनतेसाठी येथे आयोजित करण्यात आली. आयोजकांनी विनंती केली की आता सादरीकरण पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे.

श्री राजेन्द्र चोरगे यांनी परत विनंती केली आमच्या अज्ञानाचा विचार करण्यात यावा. त्यास सर्व उपस्थितांना पाठिंबा दिला.
- अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की गेले २-३ तास आपण चर्चा करत आहोत. सर्व वस्तूस्थिती लक्षात घेऊनच एक महिन्याची मुदत लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी देण्यात आलेला असून त्या हरकती तहसिल कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, म.प्र.नि. मंडळ कार्यालय यांना पाठविण्याची मुभा देण्यात आलेली आहे. आता पुढील सादरीकरण सुरु करण्यास सहकार्य करावे अशी सूचना त्यांनी केली.

त्यावेळी श्री राजेन्द्र चोरगे यांनी परत त्यांच्या चार मागण्या (पर्यावरण मुल्यांकन अहवाल हा मराठीत सर्व ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याठिकाणी दवंडी पिटविण्यात यावी, चावडी वाचन, जाहिर सूचना याबाबत निर्देश देण्यात यावेत. आम्हांला अभ्यास करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी. ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी आणि जनसुनावणी ही चार तालुक्यांची एकाच ठिकाणी घेण्याऐवजी चारही तालुक्यात वेगवेगळी सुनावणी घेण्यात यावी) मान्य करण्याचा आग्रह धरला. त्यांनी सांगितले की जिल्हा प्रशासनास पाठवविलेल्या आक्षेपातील ९७% हरकतींना उत्तर देण्यात आलेले नाही. शेवटी श्री राजेन्द्र चोरगे यांनी प्रशासन सहकार्य करत नाही, म्हणून बहिष्कार टाकला व बहुसंख्य स्थानिक शेतकरी हे सभागृह सोडून गेले.
-आयोजक यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेल्या चार मागण्यांची नोंद करण्यात आलेली आहे. तसेच आयोजक यांनी शासनातर्फे सादरीकरण पाहण्याचे आणि सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणास सुरुवात केली. त्यांनी सांगितले की प्रकल्पापासून २.२ कि.मी. अंतरावर सिंहगड किल्ला आहे. ध्वनिची पातळी ही दहा ठिकाणी तपासण्यात आलेली आहे. त्यांनी सांगितले की काही ठिकाणी भूस्खलनाचा धोका आहे. त्याठिकाणी संरक्षक भिंती बांधण्यात येणार आहेत. येथे ५४% मोकळी जागा (Open Land) तर ११% पडीक जमिन (Waste Land) आहे. एकूण अधिग्रहित जमिनीच्या ५% शेतीची जमीन आहे. भूगर्भातील पाण्यात टीडीएस आणि ईकोलायचे प्रमाण जास्त आढळले. प्रकल्पामुळे पिण्याच्या पाण्यावर काहीही परिणाम होणार नाही. या प्रकल्पात डोंगराळ भागात बोगदे बांधण्यात येतील.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हरित महामार्ग २०१५ च्या धोरणानुसार एक झाड कापावे लागले तर तीन झाडे लावण्यात येतील. या प्रकल्पामुळे रोजगारात वाढ होईल आणि या भागाचा एका बाजूस मुंबई, जेनपीटीपर्यंत व दुस-या बाजूस कोल्हापूर, बंगलुरु येथे संपर्क वाढेल तसेच परिसरातील शेतमालाला बाजार मिळेल.
सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले.

## १७) श्री संतोष घारे, गाव-जवळ, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे:-

श्री. घारे यांनी आक्षेप नोंदविला की ग्रामस्थांनी प्रांतअधिकारी, पीएमाआरडीए, एमएसआरडीसीला बरेच पर्यावरणाबाबत अनेक मुद्दे लिहून दिलेले आणि पाठविलेले आहेत. त्याचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात, सादरीकरणात कुठेही उल्लेख नाही. याचा अर्थ हा एक फक्त प्रक्रियेचा भाग दिसतो. आपण सांगता या प्रकल्पामुळे connectivity वाढणार आहे. त्यासाठी मी अगोदर म्हटले आहे की ओव्हर पास, अंडरपास कुठे हे तपासा. Connectivity वाढणार म्हटले तर पिंपोळीपासून पुणे जवळ आहे. पण पिंपोळी पासून पिरंगुटला जायचे असेल, तर प्रथम उर्सेला जावे लागेल. म्हणजे connectivity चा स्थानिकांना काहीही फायदा होणार नाही. त्यांनी जवळगावचे ओव्हर पास, अंडरपास नकाशात रस्त्यावर/रोड मॅपवर दाखविण्याची सूचना केली.

दरम्यान बहिष्कार टाकलेले श्री राजेश बबनराव शिंदे यांनी कॅमेरासमोर येऊन सांगितले की मी श्री राजेश बबनराव शिंदे, राहणार-विळे, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे, आज पर्यावरण संदर्भात बैठक घोटवडे येथे आयोजित करण्यात आलेली होती. परंतु आमच्या मुलभूत हक्कांच्या विरुध्द काही घटना घडल्या आणि आमचे कायदेशिर मुद्दे असतानाही त्यांचा विचार न झाल्यामुळे आम्ही आलेल्या शेतक-यांनी ह्या बैठकीवर बहिष्कार टाकलेला आहे. बैठक पूर्ण झाल्यावर ज्या सह्या होणे अपेक्षित आहे, त्या सह्या अगोदरच घेण्यात आलेल्या आहेत. तरी आम्ही बैठकीस आलो आणि सादरीकरण ऐकले ह्यासाठी आमच्या सह्या ग्राह्य धरु नयेत. आम्ही पूर्णपणे यावर बहिष्कार टाकलेला आहे आणि आम्ही निषेध व्यक्त करुन ही बैठक सोडलेली आहे.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री संतोष घारे यांना उत्तर देताना सांगितले की, १७९२५ ला रस्ता आहे. तेथे गाड्यांसाठी मार्गिका दिलेली आहे. १४४१० एक व्हीओपी (Vehicle Open Pass) आहे. श्री संतोष घारे यांनी आंधळे रोडला काय करणार याबाबत विचारणा केली. श्री संतोष घारे यांनी असे मत मांडले की जर प्रकल्प प्रवर्तकांचा स्वतःचा अभ्यास (self-study) नसेल, तर पर्यावरण अनुमतीसाठी वेळ मागून घ्या. कारण जो रस्ता आंधळे गावात जातो, त्यास एक फाटा फुटतो, तो जवळगावला जातो.
- आयोजक यांनी श्री संतोष घारे यांना सांगितले की, आपणास जे अपेक्षित आहे, ते सांगण्यात यावे, आक्षेप नोंदवावा अशी सूचना केली. त्यावेळी श्री घारे यांनी आक्षेप नोंदविला की एमएसआरडीसीकडे मुळ डेटाच नाही. कारण पीएमआरडीएचे २४ मीटर्सचे

आरक्षण येथे घेतलेले नाही.  २४ मीटर्सचे आरक्षण पीएमआरडीएच्या ड्राफ्टमध्ये आहे. एमएसआरडीसी प्रतिनिधींनी दिलेल्या उत्तरामुळे श्री संतोष घारे यांचे समाधान झाले नाही. त्यावेळी आयोजक यांनी श्री संतोष घारे यांनी अभ्यास केलेला असून ते त्यांच्या गावासाठी बोलत आहेत, तरी त्यांच्या शंकाचे निरसन करुन त्यांना समाधानकारक उत्तर देण्यात यावे.

श्री घारे यांनी पाण्याचे मार्ग दाखविण्याची सूचना केली. श्री घारे यांनी समितीस नोंद घेण्याची विनंती केली की एमएसआरडीसी प्रतिनिधींनीना पाण्याचे क्रॉसिंग दाखविता येत नाही.  त्यांनी याचा सविस्तर अभ्यास करुन त्याचे सादरीकरण दाखवावे. आता नैसर्गिक स्त्रोत कुठे वाहतात, याचा अभ्यास केलेला नाही. १४४१० हा डोंगर उताराचा भाग आहे. प्रत्येक ५०-१०० फुटांवर नैसर्गिक स्त्रोत आहे. श्री घारे यांनी आक्षेप नोंदविला की स्थानिक रस्त्यांबाबत एमएसआरडीसीचा अभ्यास अपूर्ण आहे.  कारण फक्त पाणी जाण्याचा मार्ग नाही, तर तेथे भातशेती आहे. जर १-२ कि.मी. अंडरपास ठेवला तर रिंगरोडबरोबरच तेथील  सर्व भातशेती नष्ट होईल.

एमएसआरडीसी प्रतिनिधींनीनी सांगितले कुठलाही पाण्याचा स्त्रोत बंद केलेला नाही.
श्री संतोष घारे यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की एमएसआरडीसी प्रतिनिधींनी अर्धवट माहिती देत आहेत.  एक शेतकरी म्हणून आम्हाला त्यांनी अंडरपास, पाण्याचे क्रॉसिंग याबाबत संपूर्ण माहिती द्यावी.
- अध्यक्ष यांनी सांगितले की याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल.
श्री घारे यांनी परत आक्षेप नोंदविला की १४७०० हा हत्तीचा रस्ता आहे. गावातील जनावरांना पाण्यावर घेऊन जाण्यासाठी हा रस्ता असून याचा जलस्त्रोत खाली आहे. तेथे के.टी.वियर बांधलेले आहे.

श्री घारे यांनी परत आक्षेप नोंदविला की येथे ६०० मीटर्सचा कॅनॉल बाधित होत आहे.
श्री. घारे यांनी आक्षेप नोंदविताना विनंती केली की मप्रनि मंडळाने एमएसआरडीसी प्रतिनिधींना जागेवर जाऊन सर्वेक्षण करावे अशी सूचना द्यावी. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना श्री घारे यांचे मुद्दे विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी तसेच त्यांनी प्रांताधिकारी कार्यालयास दिलेल्या पत्रास उत्तर द्यावे व त्याबाबत श्री घारे यांना कळवावे. तसेच प्रकल्प प्रवर्तक एमएसआरडीसी यांनी पुढील

तांत्रिक कार्यवाही करावी अशी सूचना केली. श्री घारे यांनी आक्षेप नोंदविला की पावसाचे पाणी कसे जाणार याबाबतचा कुठलाही डाटा नाही.

श्री घारे यांनी विनंती केली की एक सामाईक अभ्यास गट त्वरित गठित करण्यात यावा.
- अध्यक्ष यांनी श्री घारे यांनी घेतलेल्या आक्षेपांना सात दिवसात लेखी स्वरुपात उत्तरे देण्याचे आदेश दिले. पाण्याचे स्त्रोत, अंडर पास, ओव्हर पास व त्यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे विचारात घेण्यात यावेत व नकाशातही दाखविण्यात यावेत. त्याचप्रमाणे पुढे श्री घारे यानी त्यांचे आक्षेप एक महिन्यात म्हणजे १५ नोव्हेंबर ही अंतिम मुदत राहिल तोपर्यंत नोंदवावेत.
श्री घारे यांनी मोजणीत किती झाडे आढळली याबाबत सविस्तर आकडा देण्याची विनंती केली.
- अध्यक्ष यांनी पर्यावरणाचा विचार करुन श्री घारे यांना माहिती देण्याचे आदेश दिले.

श्री घारे यांनी पुढे सूचना केली की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना जो सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण करण्यात येते, त्यात नापीक जमिनीचा विचार करण्यात येतो. त्याचप्रमाणे रिंग रोडचे नियोजन करताना जे प्रकल्प प्रवर्तकांनी सर्वेक्षण केले, त्यावेळी स्थानिकांचा सहभाग घेण्यात यावा असे निर्देश असताना त्यांनी तो घेतला का व असल्यास त्याचा पुरावा द्यावा. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की आपल्या तीन संरेखन (Alignment) होत्या, त्या गुगल मॅपवर दाखविण्यात याव्यात. त्यांनी पिंपळे, जवळगाव बाबत विचारणा केली.
- प्रकल्प प्रवर्तकांच्या प्रतिनिधींनी ती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले.
त्यावेळी श्री घारे यांनी मत मांडले की, पर्यावरणाचा विचार केला असता सदरहू प्रकल्प हा जास्तीत जास्त नापीक जमिनीतून जायला पाहिजे. हा रिंगरोड करताना येणारी गावे ही बागायती गावे आहेत. आमच्या येथील ७०० मीटर्सचा कॅनॉल नकाशावरती दिसून येत नाही. तसेच सदर अहवाल हा अर्धवट असल्याचे व प्रकल्प प्रवर्तक उत्तरे मोघम देत असल्याचे नमूद करत सुधारित अहवाल तयार करुन परत जनसुनावणी घेण्यात यावी अशी विनंती केली.
- आयोजक यांनी श्री घारे यांना सूचना केली की आपण आपले सर्व आक्षेप लेखी स्वरुपात सादर करावेत व त्याचा इतिवृत्तामध्ये समावेश करण्यात येईल. अध्यक्ष, पर्यावरणविषयक

जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत प्रकल्प प्रवर्तक एमएसआरडीसीना आदेश दिले की सात दिवसात श्री घारे यांना बेसिक सर्वेक्षण अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा व श्री घारे यांनी त्याबाबतचे सर्व आक्षेप एक महिन्यात सादर करावेत. आयोजक यांनी पुढील सूचना, आक्षेप तहसील / जिल्हाधिकारी कार्यालय-पुणे/मप्रनि मंडळ कार्यालयात सादर करण्यात यावेत असे सांगितले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली आहे. बैठकीचे इतिवृत्तासोबत, पुढील एक महिन्यात प्राप्त होणा-या लेखी सूचना, आक्षेप, इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येतील. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल. श्री घारे यांनी आक्षेप नोंदविताना असे सांगितले की अपु-या माहितीमुळे पर्यावरणाबाबत कोणालाही आक्षेप नोंदविता आला नाही अशी नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी. त्यामुळे आलेले स्थानिक नागरिक हे जनसुनावणी सोडून गेलेले आहेत.

१८) **श्री सौरभ दळवी, शेतकरी, गाव-कांजळे, तालुका-भोर, जिल्हा-पुणे:-**

श्री. सौरभ दळवी यांनी प्रश्न उपस्थित केला की, परिसरात कुठे नोकऱ्या राहिल्यात? जर शेती नाही राहिली, तर काय करणार आहोत? या प्रकल्पामुळे बाधित होणा-या लोकांचा विचार या प्रकल्पात करण्यात आलेला नाही. हा रिंग रोड करण्यासाठी शेतजमिनीचे क्षेत्र शासन नापीक करणार आहे. या क्षेत्रात तयार होणारी सर्व पीके व त्यावर उपजीविका करणारे यांना शासन देशोधडीला लावत आहे.

- आयोजक यांनी सदरबाबतची नोंद इतिवृत्तात घेण्यात येईल असे सांगितले.

आयोजक यांनी जनसुनावणीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले व अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

सुनावणी दरम्यान अध्यक्ष यांनी घोषित केल्याप्रमाणे संबंधित ग्रामपंचायत, तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत पुढील एक महिन्यात

प्राप्त होणाऱ्या सूचना, टीका-टिप्पणी, आक्षेप मप्रनि मंडळास अवगत करण्याबाबतचे पत्र निर्गमित करण्यात आले.

त्याअनुषंगाने उपरोक्त कार्यालयांना त्यांच्याकडे प्राप्त सूचना, टीका-टिप्पणी, आक्षेप मप्रनि मंडळास अवगत करण्याबाबत कळविण्यात आले. सदर जनसुनावणी दरम्यान प्राप्त तसेच या कार्यालयास एकूण प्राप्त तेरा सूचना, टीका-टिप्पणी, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(नितीन शिंदे)**
सदस्य, समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप- प्रादेशिक अधिकारी, पुणे - २,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे

**(हिम्मत खराडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी – पुणे,
जिल्हा-पुणे